# मुंबई विद्यापीठ

## विद्यार्थी कल्याण विभाग

क्र.वि.क/51/2015

डॉ. मृदुल निळे
प्र.संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई ° 400 020

परिपत्रक ः

विषय ः दि. 27 फेब्रुवारी, 2015 रोजी 'मराठी राजभाषा दिन' साजरा करणे बाबत.
संदर्भ ः या कार्यालयाचे परिपत्रक क्र.वि.क्र/42/2015 दि. 09 फेब्रुवारी,2015.

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय परिपत्रकान्वये आपणांस महाराष्ट्र शासन व मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सूचित करण्यात आले होते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठामध्ये 'मराठी राजभाषा दिन' साजरा करण्याचा उपक्रम आपल्या शैक्षणिक संस्थेत आयोजित करण्यात यावा. त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांनी तसेच विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये/संस्थांमध्ये आपापल्या अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी व या दिनासाठी आपल्या संस्थेत सदर कार्यक्रम साजरा करण्याची रूपरेषा कशी तयार केली आहे अथवा करण्यात येत आहे त्याबाबतची माहिती त्वरित सदर विभागास कळवावी.

तसेच महाराष्ट्राची राजभाषा आणि लोकभाषा असलेल्या मराठीचे जतन व संवर्धन व्हावे, असा यामागील मुख्य हेतू आहे. सदर मराठी भाषा व वाङ्‌मय मंडळांतर्गत विविध उपक्रम राबवताना खालील हेतूंची पूर्तता करण्यात यावी.

1. विद्यार्थ्यांची वाङ्‌मयीन अभिरूची घडवणे या उपक्रमांबरोबर त्यांची भाषिक जाणीव समृध्द करणे.
2. अमराठी भाषिकांना मराठी भाषेच्या व संस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आणणे.
3. साहित्येतर व्यवहारक्षेत्रात मराठी भाषेचा वापर वाढवून मराठीला ज्ञानभाषेची प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.
4. जागतिकीरकणामुळे एकूणच भारतीय भाषांपुढे उभ्या ठाकलेल्या आव्हानांबाबत जागृती निर्माण करून त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे.

तरी, सर्व संबधितांना कळविण्यात येते की, मराठी भाषेच्या संवर्धनाबाबत विद्यापीठाला आपले दायित्व नीट पार पाडता यावे म्हणून हा महत्वपुर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे, या निर्णयाची गांभीर्याने व प्रभावीपणे अंमलबजाबणी व्हावी व तसा अहवाल सदर कार्यालयात सादर करावा.

सदर उपक्रम आपल्याकडून न राबविल्यास विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निर्णयान्वये आपल्या महाविद्यालयावर कारवाई करणे विचाराधिन ठरेल.

सही/
(डॉ.मृदुल निळे)
प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक ः 25 फेब्रुवारी, 2015.

प्रत रवाना ः प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/ विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.